28-04-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 04/27/2025 10:27 PM Page 1



निवडक



## केकेआर- पंजाब सामना पावसामुळे रद्द

**कोलकाता, दि. २७ :**

आयपीएल २०२५ मधील कोलकाता नाईट रायडर्स वि. पंजाब किंग्स यांच्यातील सामना पावसामुळे रद्द करण्यात आला. ईडन गार्डन्सवर झालेल्या या सामन्यात वादळी वारा आणि पावसाने जोरदार हजेरी लावली. पावसाने विश्रांती न घेतल्याने अखेरीस सामना रद्द झाला. यामुळे दोन्ही संघांना एक-एक गुण मिळाला आहे. यामुळे पंजाबचा संघ चौथ्या स्थानी पोहोचला आहे, तर केकेआर सातव्या स्थानी राहिला आहे. हा सामना रद्द झाल्याने प्लेऑफ गाठण्याच्या केकेआरच्या आशांना धक्का बसला आहे. पंजाबने प्रियांश आर्य आणि प्रभसिमरन सिंग यांच्या १२० धावांच्या भागीदारीच्या जोरावर २०१ धावांचा डोंगर उभारला. प्रत्युत्तरात केकेआरने पहिल्या षटकात ७ धावा करत सामन्याला चांगली सुरूवात केली, पण त्यानंतर दुसरे षटक सुरू होण्यापूर्वी पावसाने हजेरी लावली आणि सामना थांबवण्यात आला. काही वेळाने पावसाचा जोर कायम राहिल्याने सामना रद्द करण्यात आला.

# मुंबई इंडियन्सचा विजयाचा पंचकार

## बुमराह ठरला कर्दनकाळ | लखनौचा पराभव करीत गुणतालिकेत दुसऱ्या स्थानी झेप

**मुंबई, दि. २७ :** रायन रिकल्टन (५८) आणि सूर्यकुमार यादव (५४) यांच्या अर्धशतकानंतर जसप्रीत बुमराहने ( ४ विकेट्स) केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर मुंबई इंडियन्सने लखनौ सुपर जायंट्सचा वानखेडेच्या मैदानावर ५४ धावांनी मोठा पराभव केला. यासह मुंबई इंडियन्सने यंदाच्या मोसमातील सलग पाचवा विजय मिळवला आहे. मुंबईने लखनौला विजयासाठी २१६ धावांचे लक्ष्य दिले होते. पण मुंबईच्या भेदक गोलंदाजीसमोर लखनौचा संघ २० षटकांत फक्त १६१ धावा करू शकला. या मोठ्या विजयासह मुंबईचा नेट रन रेट वाढला असून चॅम्पियन मुंबई इंडियन्सचा संघ १२ गुणांसह थेट दुसऱ्या स्थानी पोहोचला आहे.



मुंबई इंडियन्सने दिलेल्या २१६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना लखनौची सुरूवात फारशी चांगली झाली नाही. मिचेल मार्श आणि एडन मारक्रम यांनी फटकेबाजी केली खरी, पण तिसऱ्या षटकात बुमराहने संघाला पहिला ब्रेकथ्रू मिळवून दिला. एडन मारक्रम ९ धावा करत बाद झाला. तर मिचेल मार्श ३४ धावा करत बाद झाला. निकोलस पुरन आणि मार्शने पॉवरप्लेमध्ये संघाला ६० धावांचा टप्पा गाठून दिला. पण विल जॅक्सने पुरन आणि पंतला एका षटकात बाद करत सामना मुंबईच्या बाजूने फिरवला.

आयुष बदोनीने संघाचा डाव सावरला, पण मुंबई इंडियन्सच्या गोलंदाजांनी फलदाजांना सामन्यात परतण्याची फारशी संधी दिली नाही. आयुष बदोनी २२ चेंडूत २ चौकार आणि २ षटकारांसह ३५ धावा करत बाद झाला. लखनौकडून ही फलंदाजाची सर्वाधिक धावसंख्या होती. याशिवाय रवी बिश्नोईने १३ धावा केल्या.

जसप्रीत बुमराहने १६व्या षटकात मिलर, अब्दुल समद व आवेश खानला क्लीन बोल्ड करत ३ विकेट्स घेतल्या आणि मुंबईचा विजय निश्चित केला. यानंतर मुंबईकडून पदार्पण करणाऱ्या कार्बिन बॉशने १९व्या षटकात बिश्नोईला क्लीन बोल्ड करत पहिली आयपीएल विकेट मिळवली. तर बोल्टने अखेरच्या षटकातील पाचव्या चेंडूवर दिग्वेश राठीला क्लीन बोल्ड करत लखनौला १६१ धावांवर गुंडाळले.. मुंबईकडून जसप्रीत बुमराहने सर्वाधिक ४ विकेट्स घेतले, तर ट्रेंट बोल्टने ३, विल जॅक्सने २ आणि कॉर्बिन बॉशने १ विकेट घेतली.

तत्पूर्वी, लखनौने नाणेफेक जिंकत मुंबई इंडियन्सला फलंदाजीसाठी पाचारण केले. रायन रिकल्टन आणि रोहित शर्माने चांगली फटकेबाजी करत संघाला चांगली सुरूवात करून दिली. पण रोहित शर्मा २ षटकारांसह १२ धावा करत झेलबाद झाला. पण यानंतर रायन रिकल्टनने संघाचा डाव सावरला. रिकल्टने ३२ चेंडूत ६ चौकार आणि ४ षटकारांसह ५८ धावा करत झेलबाद झाला. तर विल जॅक्स २९ धावा करत बाद झाला.

यानंतर सूर्यकुमार यादवने जबाबदारी घेत २८ चेंडूत ४ चौकार आणि ४ षटाकारांसह ५४ धावा केल्या. यासह सूर्याने यंदाच्या सीझनची ऑरेंज कॅपदेखील मिळवली आहे. तिलक वर्मा आणि हार्दिक मोठी धावसंख्या रचू शकले नाहीत. नमन धीर आणि कार्बिन बॉश यांनी महत्त्वपूर्ण धावा केल्या. नमन धीरने ११ चेंडूत २ चौकार आणि २ षटकारांसह २५ धावा तर कार्बिनने १० चेंडूत २ चौकार आणि एका षटकारासह २० धावा करत मुंबईची धावसंख्या २१५ वर नेली.



# पंजाबला यावर्षीही ट्रॉफी जिंकणे कठीण

**माजी क्रिकेटपटूचा रिकी पॉन्टिंगवर गंभीर आरोप**

**मुंबई, दि. २७ :** आयपीएल २०२५ मध्ये पंजाब किंग्सच्या कामगिरीवरून एक मोठी चर्चा सुरू झाली आहे. माजी भारतीय क्रिकेटपटू मनोज तिवारी यांनी पंजाब किंग्सचे मुख्य प्रशिक्षक रिकी पॉन्टिंगवर गंभीर आरोप केले आहेत. तिवारींनी दावा केला आहे की, पॉन्टिंग भारतीय खेळाडूंना नजरअंदाज करत असून परदेशी खेळाडूंना संधी देत आहे. ज्यामुळे पंजाब किंग्स आयपीएल २०२५ चा किताब जिंकण्याचा मार्ग अडचणीत येऊ शकतो. हा आरोप कोलकाता नाइट रायडर्सविरुद्धच्या सामन्यानंतर करण्यात आला आहे, जो पावसामुळे रद्द झाला. आयपीएल २०२५ मध्ये पंजाब किंग्ज (झइघड) संघाची कामगिरी आतापर्यंत उत्कृष्ट राहिली आहे, ते ११ गुणांसह पॉइंट टेबलमध्ये चौथ्या क्रमांकावर आहेत.

आयपीएल २०२५ च्या प्लेऑफमध्ये स्थान निश्चित करण्यासाठी पंजाब किंग्जला त्यांच्या उर्वरित ५ पैकी ३ सामन्यांमध्ये विजय मिळवावा लागेल. माजी भारतीय क्रिकेटपटू मनोज तिवारीने भाकित केले आहे की पंजाब किंग्ज २०२५ मध्ये त्यांची पहिली आयपीएल ट्रॉफी जिंकू शकणार नाहीत. शनिवारी ईडन गार्डन्सवर कोलकाता नाईट रायडर्स विरुद्ध पावसाने प्रभावित झालेल्या सामन्यादरम्यान फॉर्ममध्ये असलेल्या भारतीय फलंदाजांऐवजी परदेशी खेळाडूंना प्राधान्य देण्याच्या निर्णयानंतर मनोज तिवारीने मुख्य प्रशिक्षक रिकी पॉन्टिंगवर टीका केली आहे. शनिवारी पंजाब किंग्ज विरुद्ध केकेआर सामना पावसामुळे अनिर्णीत राहिला.

शनिवारी कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) विरुद्धच्या या सामन्यात पंजाब किंग्जच्या फलंदाजीदरम्यान १५व्या षटकात सलामीवीर प्रभसिमरन सिंग बाद झाल्यानंतर, मुख्य प्रशिक्षक रिकी पॉन्टिंग यांनी फॉर्ममध्ये असलेल्या भारतीय फलंदाज नेहल वढेराच्या जागी चौथ्या क्रमांकावर ग्लेन मॅक्सवेलला खेळवण्यात आले. आठ चेंडूत फक्त सात धावा काढल्यानंतर ग्लेन मॅक्सवेल बाद झाला. त्यानंतर मार्को जॅन्सन आणि जोश इंग्लिस यांना फलंदाजीसाठी पाठवण्यात आले, ज्यामुळे मनोज तिवारी आणखी संतापला.

मनोज तिवारी यांनी सोशल मीडियावर आपली नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी लिहिले की, माझी अंतर्गत भावना म्हणते की पंजाबची टीम यंदा आयपीएल ट्रॉफी जिंकू शकणार नाही, कारण आज त्यांनी बॅटिंग करताना जे दिसले, त्यात कोचने भारतीय फॉर्ममधील फलंदाज नेहल वढेरा आणि शशांक सिंग यांना पाठवले नाही. त्याने परदेशी खेळाडूंवर विश्वास ठेवला, पण त्यांच्याकडून अपेक्षित कामगिरी झाली नाही आणि यातून भारतीय खेळाडूंवर विश्वासाअभाव दिसून आला. तिवारींनी पुढे म्हटले की, जर पॉन्टिंगने ही रणनीती कायम ठेवली, तर पंजाबचा संघ टॉप टू मध्ये स्थान मिळवले तरी आयपीएलची ट्रॉफी जिंकू शकणार नाही, असं म्हटलं आहे.

# गुजरात प्ले ऑफचे तिकिट निश्चित करणार?

## राजस्थानसाठीही विजय आवश्यकच | साई सुदर्शन, बटलरला रोखण्याचे रॉयल्ससमोर आव्हान

**जयपूर, दि. २७ :** इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) सामन्यात फॉर्ममध्ये असलेल्या गुजरात टायटन्सचा सामना उद्या सोमवारी जयपूरमधील सवाई मानसिंग स्टेडियमवर

संध्याकाळी ७:३० वाजता राजस्थान रॉयल्सशी होईल. गुजरातचे ध्येय अव्वल स्थानावरील पकड मजबूत करणे आणि प्लेऑफमध्ये स्थान निश्चित करण्याच्या जवळ जाणे असेल. त्याचवेळी, राजस्थान संघाला कोणत्याही परिस्थितीत प्लेऑफ फेरी गाठायची असल्यास विजय मिळवावाच लागणार आहे.

शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील संघ आठ सामन्यांपैकी सहा विजयांसह १० संघांच्या गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे आणि प्लेऑफमध्ये पोहोचण्यासाठी त्यांना आणखी दोन विजयांची आवश्यकता आहे. गुजरात टायटन्सने चालू हंगामात चमकदार कामगिरी केली आहे आणि त्यांना फक्त दोनदा पराभवाचा सामना करावा लागला आहे. साई सुदर्शन आणि प्रसिद्ध कृष्णा अनुक्रमे ऑरेंज (सर्वाधिक धावा) आणि पर्पल (सर्वाधिक बळी) कॅप्सच्या शर्यतीत आघाडीवर आहेत.

गुजरात संघासाठी गिल, सुदर्शन आणि जोस बटलर उत्तम फॉर्ममध्ये आहेत. या त्रिकुटातील तिन्ही फलंदाजांनी चालू हंगामात ३०० पेक्षा जास्त धावा केल्या आहेत आणि या काळात त्यांचा स्ट्राईक रेटही १५० पेक्षा जास्त आहे. अनुभवी कागिसो रबाडा हंगामाच्या सुरुवातीला वैयक्तिक कारणांमुळे मायदेशी परतला, परंतु तरीही गोलंदाजी संघाची मुख्य ताकद म्हणून उदयास आली आहे.





अनेक दुखापतींनंतर स्पर्धात्मक टी-२० क्रिकेटमध्ये परतलेल्या प्रसिद्धने चमकदार कामगिरी केली आहे. त्याने आठ सामन्यांमध्ये १४.१२ च्या सरासरीने १६ विकेट्स घेतल्या आहेत. फलंदाजांना फसवण्याची आणि चेंडूची लांबी बदलण्याची त्याची क्षमता त्याच्या यशाची गुरुकिल्ली आहे. मोहम्मद सिराजने गोलंदाजीतही प्रभावी कामगिरी केली आहे, त्याने आतापर्यंत १२ बळी घेतले आहेत आणि सर्वाधिक बळी घेणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत तो संयुक्तपणे पाचव्या स्थानावर आहे. या हंगामात आर साई किशोर हे टॉप पाच विकेट घेणाऱ्या गोलंदाजांमध्येही आहेत. डावखुरा फिरकी गोलंदाजाने ८.२२ च्या इकॉनॉमी दराने १२ विकेट्स घेतल्या आहेत. टायटन्सकडे इशांत शर्मा, वॉशिंग्टन सुंदर आणि कुलवंत खेजरोलियासारखे खेळाडू आहेत आणि संघाने त्यांचा प्रभावी खेळाडू म्हणून प्रभावीपणे वापर केला आहे.

दुसरीकडे, राजस्थान रॉयल्स या आठवड्याच्या सुरुवातीला रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून ११ धावांनी पराभूत झाल्यानंतर स्पर्धेतून बाहेर पडण्याच्या जवळ पोहोचला होता. हा त्यांचा सलग पाचवा आणि नऊ सामन्यांमधील सातवा पराभव होता. ते आता पॉइंट्स टेबलमध्ये नवव्या स्थानावर आहेत. लीगच्या पहिल्या हंगामातील विजेत्यांना संपूर्ण हंगामात लय मिळविण्यासाठी संघर्ष करावा लागला. संघ गेल्या तीन सामन्यांमध्ये विजयाच्या जवळ पोहोचला होता, परंतु जवळच्या सामन्यांना आपल्या बाजूने वळवण्यात तो अपयशी ठरला. यामध्ये दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या सुपर ओव्हरमधील हृदयद्रावक पराभवाचाही समावेश आहे. वरच्या क्रमांकावर यशस्वी जयस्वाल, रियान पराग आणि नितीश राणा यांनी चांगली फलंदाजी केली आहे पण त्यांची गोलंदाजी निराशाजनक ठरली आहे. गोलंदाजांना धावगतीवर नियंत्रण ठेवण्यात आणि महत्त्वाच्या क्षणी विकेट घेण्यास अपयश आले आहे आणि त्याचे परिणाम संघाला भोगावे लागले आहेत.

**संभाव्य प्रतिस्पर्धी संघ :**

**राजस्थान रॉयल्स :** यशस्वी जयस्वाल, वैभव सूर्यवंशी, नितीश राणा, रियान पराग, ध्रुव जुरेल (यष्टीरक्षक), शिमरोन हेटमायर, वानिंदू हसरंगा, जोफ्रा आर्चर, महेश थेक्षाना, तुषार देशपांडे, संदीप शर्मा.

**गुजरात टायटन्स :** साई सुदर्शन, शुभमन गिल (कर्णधार), जोश बटलर (यष्टीरक्षक), शेरफेन रदरफोर्ड, शाहरुख खान, राहुल तेवतिया, वॉशिंग्टन सुंदर, राहुल तेवतिया, रशीद खान, आर साई किशोर, मोहम्मद सिराज.

# बुमराहसोबत इंग्लंडमध्ये ऑस्ट्रेलियासारखी चूक टाळा!

**टीम इंडियाला माजी प्रशिक्षक रवी शास्त्रींचा इशारा**



**मुंबई, दि. २७ :** या वर्षाच्या सुरुवातीला ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर भारतीय क्रिकेट संघाला पराभवाचा सामना करावा लागला होता. सिडनी कसोटीत जसप्रीत बुमराह दुसऱ्या डावात गोलंदाजी करू शकला नाही. त्यानंतर तो चॅम्पियन्स ट्रॉफीमध्येही खेळला नाही. तो आयपीएलच्या पहिल्या काही सामन्यांमध्ये खेळला नाही आणि त्यानंतर त्याने जोरदार पुनरागमन केले. बुमराहने आयपीएलच्या या हंगामात ५ सामन्यांमध्ये ५ विकेट घेतल्या आहेत. स्पर्धेनंतर इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत कहर करण्यावर त्याचे लक्ष आहे.

या दौऱ्यात भारतीय संघाला बुमराहकडूनही मोठ्या अपेक्षा आहेत. तो मोहम्मद शमी आणि मोहम्मद सिराज यांच्यासोबत गोलंदाजी त्रिकुट तयार करेल. इंग्लंडच्या भूमीवर ८ कसोटी सामन्यात ३७ बळी घेणारा बुमराह हा या दौऱ्यात भारतीय संघाचा सर्वात मोठा शस्त्र असेल. तो त्याच्या पाचव्या कसोटी सामन्यात खेळेल हे जवळजवळ निश्चित आहे. मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात या दौऱ्यासाठी संघाची घोषणा केली जाऊ शकते. त्याआधी माजी प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी संघ व्यवस्थापनाला मोठा इशारा दिला आहे.

शास्त्री यांनी इंग्लंडमध्ये बुमराहचा वर्कलोड कसा सांभाळता येईल हे स्पष्ट केले. शास्त्री म्हणाले, मी बुमराहबद्दल खूप काळजी घेईन. मी त्यांना एका वेळी दोन कसोटी सामने खेळवीन आणि नंतर ब्रेकची वाट पाहिन. आदर्शपणे, त्यांना चार सामने खेळवावेत. जर त्याने चांगली सुरुवात केली तर त्याला पाच सामने देण्यास तुम्हाला हरकत का आहे, परंतु ते त्याच्या शरीराची प्रतिक्रिया कशी आहे यावर अवलंबून आहे. त्यांना म्हणण्याची संधी दिली पाहिजे, हो, मला तणाव जाणवतो. ब्रेक उपयुक्त ठरेल.

जूनमध्ये सुरू होणाऱ्या पाच सामन्यांच्या मालिकेत भारताचे खराब फॉर्म असलेले वेगवान गोलंदाज त्रिकूट इंग्लंडच्या फलंदाजांना आव्हान देतील असे शास्त्रींना वाटते. शास्त्री म्हणाले, मला वाटते की सिराज, जसप्रीत आणि मोहम्मद शमी जर पूर्णपणे तंदुरुस्त असतील तर ते इंग्लंडच्या फलंदाजांना खूप त्रास देतील. चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी संघात समावेश न झाल्यामुळे सिराजचे मन दुखावले गेले याचा मला आनंद आहे. कारण त्यानंतर त्याच्या चेंडूत उडी आहे, वेग वाढला आहे आणि तो प्रत्येक सामन्यात गंभीर आहे.

# अभिषेक नायर बनला मुंबईचा मेंटॉर

## टी- ट्वेंटी मुंबई लीगच्या लिलावात करणार मार्गदर्शन

**मुंबई, दि. २७ :** भारतीय क्रिकेट संघाच्या सहाय्यक प्रशिक्षकपदावरून अभिषेक नायर यांना अलीकडेच हटविल्यानंतर त्यांनी तातडीने नव्या संधी स्वीकारल्या आहेत. सध्या ते इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) २०२५ मध्ये कोलकाता नाइट रायडर्स (केकेआर) च्या सहाय्यक प्रशिक्षकपदी कार्यरत आहेत. याशिवाय, त्यांना टी- ट्वेंटी मुंबई लीगच्या तिसऱ्या हंगामात मुंबई साउथ सेंट्रल मराठा रॉयल्स या संघाचे मेंटॉर म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. ही लीग २६ मे २०२५ पासून सुरू होणार असून, नायर मुंबईचे माजी जलदगती गोलंदाज अमित दानी यांच्यासोबत काम करतील आणि ७ मे रोजी होणाऱ्या खेळाडूंच्या लिलावात संघाला मार्गदर्शन करणार आहेत.

नायर यांच्या या नव्या भूमिकेमुळे त्यांचा अनुभव आणि रणनीतीक कौशल्य स्थानिक क्रिकेटपटूंना लाभेल, अशी अपेक्षा आहे. यापूर्वी त्यांनी केकेआरसोबत काम करताना रिंकू सिंह, वरुण चक्रवर्ती, आणि वेंकटेश अय्यर यांसारख्या खेळाडूंच्या यशात महत्त्वाची भूमिका बजावली होती.

टी२० मुंबई लीगमधील त्यांची नियुक्ती आणि केकेआरमधील सक्रिय सहभाग यामुळे नायर यांचे क्रिकेट विश्वातील योगदान आणि मागणी कायम असल्याचे दिसून येते. अभिषेक नायर यांना भारतीय क्रिकेट संघाच्या सहाय्यक प्रशिक्षकपदावरून काढण्यामागे अनेक कारणे समोर आली आहेत. यामध्ये मुख्यत्वे बॉर्डर-गावस्कर ट्रॉफी २०२४-२५ मधील संघाची खराब कामगिरी आणि अंतर्गत मतभेद यांचा समावेश आहे.

भारतीय संघाला २०२४ मध्ये न्यूझीलंडविरुद्ध घरच्या मैदानावर ०-३ अशी लाजिरवाणी हार पत्करावी लागली. त्यानंतर ऑस्ट्रेलियाविरुद्ध बॉर्डर-गावसकर ट्रॉफीमध्ये १-३ असा पराभव पत्करावा लागला. या खराब कामगिरीमुळे विशेषत: फलंदाजांच्या अपयशावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले. ज्यामुळे फलंदाजी प्रशिक्षक म्हणून नायर यांच्या भूमिकेवर टीका झाली. नायर यांचे सपोर्ट स्टाफमधील एका उच्च-प्रोफाइल सदस्याशी किंवा वरिष्ठ खेळाडूशी मतभेद झाले होते. या मतभेदांमुळे त्यांना बळीचा बकरा बनवण्यात आल्याची चर्चा आहे. नायर यांना हटवण्याची योजना सितांशु कोटक यांना अतिरिक्त फलंदाजी प्रशिक्षक म्हणून नियुक्त केल्यानंतरच तयार झाल्याचे दिसते. बीसीसीआयने सपोर्ट स्टाफच्या कार्यकाळाला तीन वर्षांपर्यंत मर्यादित करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे नायर यांच्यासह क्षेत्ररक्षण प्रशिक्षक टी. दिलीप आणि स्ट्रेंथ अँड कंडिशनिंग प्रशिक्षक सोहम देसाई यांनाही हटवण्यात आले.



# श्रेयस अय्यर उत्तम कर्णधार : आरपी सिंग

**मुंबई, दि. २७ :**

श्रेयस अय्यर हा एक उत्तम कर्णधार आहे. तो अगदी क्वचितच मूलभूत चुका करतो, असे माजी भारतीय वेगवान गोलंदाज आरपी सिंग याने म्हटले आहे. आयपीएल-२०२५ मधील सर्वोत्तम गोलंदाजी युनिटबद्दल बोलताना आरपी सिंग म्हणाला की, मुंबईकडे या हंगामातील सर्वोत्तम गोलंदाजी युनिट आहे.

श्रेयस अय्यर एक उत्तम कर्णधार आहे. गेल्या वर्षी कोलकाता नाईट रायडर्सला चॅम्पियन बनवून त्याने हे सिद्ध केले आहे. श्रेयसचे स्वतःचे विचार आणि रणनीती आहे, जे तो खूप चांगल्या प्रकारे वापरतो. तो घाबरून जात नाही आणि खूप कमी मूलभूत चुका करतो.

श्रेयसच्या नेतृत्वाखाली, पंजाब या हंगामात ८ पैकी ५ सामने जिंकून पॉइंट्स टेबलमध्ये ५ व्या स्थानावर आहे. श्रेयसच्या नेतृत्वाखाली, पंजाब या हंगामात ८ पैकी ५ सामने जिंकून पॉइंट्स टेबलमध्ये ५ व्या स्थानावर आहे. मुंबई आणि पंजाबची गोलंदाजी उत्कृष्ट आहे.

मला वाटतं या हंगामात मुंबई इंडियन्सकडे सर्वोत्तम गोलंदाजी युनिट आहे. संघाने गोलंदाजीचे प्रशिक्षण घेतले आहे. ट्रेंट बोल्ट आणि दीपक चहर यांना आयपीएलचा चांगला अनुभव आहे. जसप्रीत बुमराह परतला आहे, पूर्णपणे नाही पण तो ८५% तंदुरुस्त आहे. हार्दिक जो या वर्षीही खूप चांगला खेळत आहे आणि त्यानंतर मिशेल सँटनर आहे. तर, या बाबतीत मुंबई इंडियन्सची गोलंदाजी खूप चांगली आहे. दुसऱ्या क्रमांकावर पंजाब आहे, जिथे वेगवान आणि फिरकी गोलंदाजीचे चांगले मिश्रण आहे.

कोलकाता नाईट रायडर्सचा फलंदाज व्यंकटेश अय्यर आयपीएल २०२५ मध्ये सतत अपयशी ठरत आहे. आरपी सिंग म्हणाला की, कदाचित त्याला ज्या रकमेत खरेदी करण्यात आले होते, ते त्याच्या मनात चालू असेल.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २३५ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 235 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .